चाहूल...

ती नकळत दारी, आठवांच्या वाहून लहरी
पानात थेंब अडकले, संपले नभातील पाणी.

तुझ्या हातीची जाई, रात्रीस गंध भरारी
तुला साद घाली, श्वासांची स्पंदून गाणी

या मितीस आजही, पारवा गवसणी घाली,
कोठे स्थिरावे आता, किती सुचवावे मनांनी

अंधार पोचला तिकडे, थबकला पाहुनी समई
निरुपाय होऊनि फिरला, तेवते समई शुभ्रकळ्यांनी

मी दूर फिरुनी, क्षितिजास आलो बिलगूनी
तू येशील इतुक्यांत, पूर्वेच्या सोन किरणांनी

मी तिष्ठत राही, अवकाश अथांग समोरी
अवघा कवेत येईल, सोबत तुझ्या क्षणांनी

भवताल फिरुनी थकला, आवेग मनाचा बहरी
आतुर जीवाला सावरी, चाहूल तुझी साजणी

© www.saarthbodh.com

**सचिन कुलकर्णी**